**"जुलै २०२०" या महिन्यात सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालयामधील सेवा उपविभागाने घेतलेल्या महत्त्वाच्या निर्णयांची संक्षिप्त माहिती ...**

## (क) शासन निर्णय / अधिसूचना

- दिनांक ७ जुलै २०२० च्या शासन निर्णयान्वये कोविड-१९ या संसर्गजन्य रोगाच्या पार्श्वभूमीवर सन २०२०-२१ या आर्थिक वर्षातील बदल्यांसंदर्भात करावयाच्याच्या सूचना निर्गमित केल्या आहेत. चालू वित्तीय वर्षात दिनांक ३१ मे २०२० पर्यंत करावयाच्या सर्वसाधारण बदल्या दिनांक ३१ जुलै २०२० पर्यंत त्या त्या संवर्गातील एकूण कार्यरत पदांच्या १५% एवढया मर्यादेत करण्यात याव्यात.
- दिनांक ९ जुलै २०१९ च्या शासन पत्रान्वये सरळसेवेने नियुक्तीबाबतच्या मार्गदर्शक सूचना व वेळापत्रकाचे प्रारुप शासन निर्णयाबाबत अभिप्राय सर्व मंत्रालयीन विभागाकडून मागविण्यात आले आहे.
- दिनांक २३ जुलै २०२० च्या शासन निर्णयान्वये सन २०२०-२१ या वर्षात दिनांक ३१ जुलै २०२० पर्यंत सर्वसाधारण बदल्या करण्यास दिलेली मुदत दिनांक १० ऑगस्ट २०२० पर्यंत वाढविण्यात आली.
- दिनांक २८ जुलै २०२० च्या शासन निर्णयान्वये एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत सन २०२०-२१ करिता वनामती, नागपूर या प्रशिक्षण संस्थेस एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमाकरिता ३६ सहायक अनुदाने (वेतन) या उद्दिष्टाखाली रु.७०.९४ लाख तसेच ३१ सहायक अनुदान (वेतनेतर) उद्दिष्टाखाली रु.६८६.०७ लाख अशी एकूण रु.७५७.०१ लाख इतकी अर्थसंकल्पीय तरतूद मंजूर करण्यात आली आहे. त्यापैकी आता ३६ सहायक अनुदाने (वेतन) या उद्दिष्टाखाली माहे जुलै २०२० करिता रु.७.०९४ लाख इतकी रक्कम वितरित करण्यात आली आहे.
- दिनांक ३० जुलै २०२० च्या शासन निर्णयान्वये सामान्य प्रशासन विभाग (खुद्द) साठी संगणक, प्रिंटर व स्कॅनर दुरुस्तीसाठी मे.बेस टॉप टेक्नॉलॉजी, मुंबई या कंपनीशी दिनांक २१ जुलै २०२० ते २० जुलै २०२१ या एक वर्षासाठी सेवासंविदेचा करार करण्यात आला आहे. सेवासंविदेच्या करारासाठी येणाऱ्या रु.२,००,२००/- इतक्या खर्चास शासन मान्यता देण्यात आली आहे.

## (ख) प्रशिक्षण

- दिनांक २० जुलै २०२० च्या शासन निर्णयान्वये सहायक कक्ष अधिकारी सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा २०१९ चा निकाल जाहिर करण्यात आला आहे.

## (ग) बदली / मुदतपूर्व बदली / बदलीस स्थगिती / बदली रद्द / पदस्थापनेत बदल / कार्यमुक्त

- भारतीय प्रशासन सेवेतील १४ अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत.
- ३ उपसचि व १ वरिष्ठ स्वीय सहायक यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत.
- १ अवर सचिव व १ निवडश्रेणी लघुलेखकअशा २ अधिकाऱ्यांना प्रतिनियुक्तीने नियुक्ती देण्यात आली आहे.
- एका उच्चश्रेणी लघुलेखकाची प्रत्यावर्तनानंतर पदस्थापना देण्यात आली आहे.
- दिनांक ८ जुलै २०२० च्या शासन आदेशान्वये कार्यासन-१४ मध्ये ज्येष्ठतासूची तयार करण्यासाठी स्थापन केलेल्या सेलसाठी अधिग्रिहित केलेल्या २ सहायक कक्ष अधिकारी, १ लिपिक-टंकलेखक यांच्या सेवा ३१ डिसेंबर २०२० पर्यंत वाढविण्यात आल्या आहेत.

## (घ) ज्येष्ठतासूची

- दिनांक ३१ जुलै २०२० च्या शासन परिपत्रकान्वये गट-क मधील लिपिक-टंकलेखक पदावर पदोन्नतीसाठी अर्हताप्राप्त करणाऱ्या मंत्रालयीन विभागातील गट-ड मधील कर्मचाऱ्यांची दिनांक २१ फेब्रवारी २०१८ रोजीची तात्पुरती ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.
- दिनांक ३१ जुलै २०२० च्या शासन परिपत्रकान्वये गट-क मधील लिपिक-टंकलेखक पदावर पदोन्नतीसाठी अर्हताप्राप्त करणाऱ्या मंत्रालयीन विभागातील गट-ड मधील कर्मचाऱ्यांची दिनांक १ जानेवारी २०२० रोजीची तात्पुरती ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.